# जनसंपर्क विभाग

जळगाव – दि. ९ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणाच्या निवडणूकीसाठी रविवारी झालेल्या मतदानाची उद्या मंगळवारी दि. १० जानेवारी रोजी सकाळी १० वाजता विद्यापीठातील कर्मचारी भवनात मतमोजणी होणार आहे.

विद्यापीठाच्या अधिसभा, विद्यापरिषद आणि अभ्यास मंडळांसाठी रविवारी शांततेत निवडणूक पार पडली. सरासरी ९७% मतदान झाले. अधिसभेच्या २२ आणि विद्यापरिषदेच्या ४ जागा तसेच १३ अभ्यासमंडळाच्या जागांसाठी ही निवडणूक प्रक्रिया पार पडली.

मंगळवारी सकाळी १० वाजता विद्यापीठातील कर्मचारी भवनात मतमोजणीला प्रारंभ होणार आहे. मतमोजणीच्या ठिकाणी १० टेबल ठेवण्यात आले असून ५ टेबलावर प्रत्यक्ष मतमोजणी होईल. तत्पूर्वी सर्व मतपेट्या उघडल्यानंतर सरमिसळ करून प्राधिकरणानिहाय मतपत्रिका ठेवल्या जातील. वैध अवैध अशा मतपत्रिका निश्चित केल्यानंतर उमेदवाराला निवडून येण्याचा येण्यासाठीचा कोटा निश्चित केला जाईल. एका टेबलावर पाच ते सहा कर्मचारी प्रत्यक्ष मतमोजणी करतील. या संपूर्ण मतमोजणी प्रक्रियेसाठी विद्यापीठाचे जवळपास १०० कर्मचारी कार्यरत राहणार आहेत. प्रत्यक्ष मतमोजणीच्या ठिकाणी उमेदवार अथवा उमेदवाराने नियुक्त केलेला प्रतिनिधी यांनाच प्रवेश दिला जाणार आहे. इतरांना कर्मचारी भवनाच्या समोर शामियानात बसण्याची व्यवस्था करण्यात आली आहे अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी दिली. दरम्यान मतमोजणीसाठी कार्यरत असणा-या कर्मचा-यांना सोमवारी प्रशिक्षण देवून मतमोजणी कशी होणार आहे यांची माहिती देण्यात आली.

## बातमी नं.२

जळगाव – दि. ९ (प्रतिनिधी) पुणे येथील अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठ येथे उद्या दिनांक १० व ११ जानेवारी रोजी होत असलेल्या पूर्व विभागीय अन्वेषण संशोधन स्पर्धेसाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा पाच विद्यार्थ्यांचा संघ रवाना झाला आहे.

अन्वेषण संशोधन विषयक राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा दोन टप्यात घेतली जाते. यातील पूर्व विभागीय स्पर्धा पुणे येथे १० व ११ जानेवारी रोजी होत आहे. पुणे, जळगाव, मुंबई, औरंगाबाद, कोल्हापूर आणि नांदेड येथील विद्यापीठे या पूर्व विभागीय अन्वेषण संशोधन स्पर्धेत सहभागी होणार आहेत. या स्पर्धेसाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे रिया जैन, श्रेया जैन, निरज पवार, झिया खान आणि सोपान नांगरे या पाच विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. या विद्यार्थ्यांसोबत समन्वयक डॉ. व्ही. एम. रोकडे आणि संघ व्यवस्थापक म्हणून तबस्सूम मन्सूरी रवाना होत आहेत.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: ९ जानेवारी, २०२३

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी